www.learningwithsmartness.in

# शिष्यवृत्ती सराव पेपर

## विषय - भाषा गुण 30 गुण

घटक : उतारा | सराव प्रश्नपत्रिका

Learning With Smartness

Name : ______________________

https://learningwithsmartness.in/

उतारा १

आजच्या युगात संगणक आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. संगणकाचा उपयोग शिक्षण, व्यवसाय, मनोरंजन आणि आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होतो. विद्यार्थ्यांसाठी संगणक म्हणजे माहिती मिळवण्याचे एक उत्तम साधन आहे. इंटरनेटच्या साहाय्याने आपण कोणत्याही विषयाची माहिती मिळवू शकतो. संगणकामुळे काम करणे सोपे झाले आहे; याचा उपयोग गणना करणे, नोंदी ठेवणे आणि डिझाईन तयार करण्यासाठीही होतो.

परंतु संगणकाचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. लहान मुलांनी खेळांमध्ये जास्त वेळ घालवू नये आणि शिक्षणासाठी त्याचा वापर करावा. संगणकामुळे आपले जीवन सुलभ झाले आहे, परंतु त्याचा अतिरेक होऊ नये, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

प्रश्न १) संगणकाचा वापर खालीलपैकी कोणत्या गोष्टीसाठी होतो?

(१) फक्त खेळण्यासाठी (२) फक्त गप्पा मारण्यासाठी (३) माहिती मिळवण्यासाठी आणि काम करण्यासाठी (४) फक्त चित्र काढण्यासाठी

प्रश्न २) खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

(१) संगणकाचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. (२) संगणकामुळे आपले जीवन सुलभ झाले आहे. (३) संगणकाचा उपयोग गणिती क्रिया करण्यासाठी होतो. (४) वरील सर्व बरोबर

प्रश्न ३) उताऱ्यात इंग्लिश भाषेतील किती शब्द आले आहेत?

(१) एक (२) दोन (३) तीन (४) चार

उतारा २

असाच एक डोंगरदऱ्यांनी वेढलेला आदिवासी पाडा. पाण्याच्या शोधासाठी तिथे मैलोनमैल भटकंती करावी लागे. त्याचा आदिवासी पाड्यावर अनवाणी पायांनी चालणारी, लाकूडफाटा गोळा करणारी एक मुलगी. तिने राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा दबदबा निर्माण केला आणि ऑलिंपिक

स्तरावर झेप घेतली. या आंतरराष्ट्रीय धावपटूचे नाव आहे कविता राऊत आणि त्या पाड्याचे नाव आहे सावरपाडा. हा पाडा नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आहे. कविताचे बालपण निसर्गाच्या सान्निध्यात गेले. तिची आजवरची वाटचाल एक दीर्घ साधना बनली आहे.

प्रश्न ४) ‘अनवाणी’ या शब्दाचा अचूक अर्थ कोणता?

(१) जेवण न जेवता (२) पाणी न पिता (३) पायात वहाण न घालता (४) वरील सर्व बरोबर

प्रश्न ५) ‘भटकंती करणे’ या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ कोणता?

(१) फिरणे (२) वाटचाल (३) गाडी चालविणे (४) वरील सर्व बरोबर

प्रश्न ६) वरील उताऱ्यातून आदिवासी पाड्यामधील कोणती समस्या दिसून येते?

(१) पाणी प्रदूषण (२) पाणी टंचाई (३) ओला दुष्काळ (४) वरील सर्व बरोबर

प्रश्न ७) खालील पैकी कोणता जोडशब्द नाही?

(१) लाकुडफाटा (२) भाजीभाकरी (३) सगेसोयरे (४) गैरहजर

प्रश्न ८) खालील पैकी अशुद्ध शब्द ओळखा.

(१) जमीन (२) कुंठीत (३) गरीब (४) विहिर

उतारा ३

आमचं शहर इतर शहरांसारखंच गजबजलेलं आहे. उंच इमारती, रस्ते, बाजार इथे सारं काही आहे आणि त्यात सतत भरच पडते आहे. पण आमच्या शहरात रस्त्याच्या कडेनं, बागांमधून, इमारतींभोवती, घरांसमोर, सोसायट्यांच्या आवारात झाडंही आहेत. एखाद्या इमारतीच्या गच्चीवरून शहराकडे पाहिलं तर वाटेल, केवढी हिरवाई आहे! पण हिरवाई म्हणजे काय? झाडं? झाडं तर आहेतच. पण त्यांच्या जोडीला काय काय असतं! झुडपं, वेली, गवतं आणि असं बरंच काही. आपण गाडीतून किंवा गाडीवरून भर्रकन जाताना आपल्याला काय दिसणार! कधी सिग्नलला एखादा फुललेला शोभिवंत वृक्ष नजर वेधून घेतो, पण तेवढाच. कधी गाडीवर कसलीशी फळं पडून गाडी 'घाण' होऊन जाते आणि आपण करवादतो, कुठलं हे झाड! कदंब! कुणीतरी सांगतं. असेना का कुठलंही, त्याचा जरा वैतागच आहे! आणि नारळाच्या झाडाखाली तर पाटीच असते, 'येथे गाडी उभी करू नये, नारळ पडण्याचा धोका!' गेली जागा! शहरात झाडं म्हणजे असून अडचण आणि नसून खोळंबा!

प्रश्न ९) सदर उताऱ्यात कशाचे वर्णन आलेले आहे?

(१) गाव (२) शहर (३) शेती (४) बाजार

प्रश्न १०) शहर कशाने गजबजलेलं आहे?

(१) रस्ते (२) झाडे (३) वेली (४) पशुपक्षी

https://learningwithsmartness.in/

प्रश्न ११) सिग्नलला एखादा फुललेला शोभिवंत...... नजर वेधून घेतो.

(१) झुडूप (२) वेली (३) वृक्ष (४) गवत

प्रश्न १२) शहरात झाडे कुठे कुठे आढळतात?

(१) उंच इमारती (२) रस्ते (३) बाजार (४) घरांसमोर

उतारा ४

मोराचा केकारव वर्षा ऋतूचे आगमन सुचवणारा आहे. ग्रीष्म ऋतू संपता संपता उष्णता असह्य होते. त्यावेळी येणारा वर्षासूचक केकारव शेतकऱ्यांमध्ये नवीन आशेचा संचार करतो. ती लवकरच येणाऱ्या पावसाची पूर्वसूचना असते. वर्षा ऋतू हा आनंदाचा काळ आहे. तळ्याची पाळ, हिरवीगार कुरणे, देवालयाची उंच शिखरे, नदी-नाले, ओहोळाचे काठ ही यावेळी मोराच्या स्वैर विहाराची स्थाने असतात. मोर नेहमी आपल्या निवासस्थानापासून अर्धा ते दोन किलोमीटरच्या परिसरात वावरतो. चारा सापडेल त्याप्रमाणे तो फिरतो. तो आपला चारा दिवसाचं शोधतो. काळोख पडण्यापूर्वी तो आपल्या जागेवर येऊन पोहोचतो.

प्रश्न १३) मोराच्या ओरडण्याला काय म्हणतात?

(१) आरवणे (२) केकारव (३) कलकलाट (४) गुंजारव

प्रश्न १४) खालीलपैकी कोणत्या स्थानी मोर स्वैर विहार करत नाही?

(१) तळ्याची पाळ (२) हिरवीगार कुरणे (३) मनुष्यवस्ती (४) नदी-नाले

प्रश्न १५) प्राणी किंवा पक्षांना चारा मिळवण्यासाठी आवडणारी जागा कोणती?

(१) जंगल (२) अंगण (३) उघडे बोडके डोंगर (४) हिरवेकर पुरण

शिष्यवृत्ती परीक्षा चौथी सराव पेपर सोडवण्यासाठी खालील वेबसाईटला भेट द्या.

https://learningwithsmartness.in/

NAVNTAH MOHAN LAD

https://learningwithsmartness.in/